(3 Hours) **(Total Marks : 100)**

Please check whether you have the right question paper.

N.B.:
1) **All** Questions are **Compulsory**.
2) **Figures** to the **right** indicate **full marks** allotted to the question.
3) **Working Notes** should form the **part of your answer**.
4) Calculate figures upto **two decimal points**, wherever **required**.
5) Provisions of **GST Act** as on **01.04.2018** have to be considered. **Amendments made** to the act thereafter are to be **ignored**.

1. A) Select the most appropriate option and rewrite the full sentence. **(Any Ten)** : **(10)**

1) Alcoholic Liquor for human consumption is subject to : _____.
   a) CGST b) SGST
   c) IGST d) None of the Above
2) Goods and Service Tax is a tax levied on goods and services at each point of _____.
   a) Demand b) Cash Sale
   c) Supply d) Manufacturing
3) The definition of "Goods" under the GST Act does not include _____.
   a) Grass b) Growing Crops
   c) Actionable Claims d) Money and Securities
4) M/s. Deepak Enterprises of Mumbai supplies Goods to M/s Jyoti Associates Rajasthan, this will classify as : _____.
   a) Export Supply b) Import Supply
   c) Intra State Supply d) Inter State Supply
5) For services of Beauty Treatment, the place of supply is the location : _____.
   a) of recipient
   b) Where services are actually performed
   c) of Supplier
   d) of registered Person
6) Maximum time for availing Input Tax Credit is _____.
   a) The date of filing of the Annual Return
   b) Due date of filing of Return for the month of September
   c) Earliest of (a) and (b) above
   d) Later of (a) and (b) above
7) The Form used for Registration is _____.
   a) Form GSTR-1 b) Form GSTA-I
   c) Form GST-REG-01 d) Form GST Reg
8) Taxable minimum turnover limit in GST that is applicable in the state of Maharashtra is _____.
   a) ₹10 Lakhs b) ₹20 Lakhs
   c) ₹25 Lakhs d) ₹75 Lakhs
9) The Tax deducted has to be paid to the Government within _____ days after the end of the month in which deducted
   a) 7 b) 10
   c) 15 d) 20

FE409F2E3556320D906A8070223534F3

10) Shyam purchased goods for which the tax invoice was ₹84,000 including IGST of @ 12%. The input tax credit under IGST shall be : _____.

a) ₹9,000 b) ₹4,500

c) ₹10,080 d) None of the Above

11) Mr. Ujwal has an outward tax liability under IGST of ₹40,000. The unutilized input Tax Credit available under CGST is ₹10,000/- and under SGST is ₹10,000/-, the net liability payable would be.

a) ₹20,000 b) ₹40,000

c) ₹60,000 d) None of the Above

12) Transaction Value of Supply includes : _____.

a) Subsidies
b) Incidental Charges
c) Taxes, duties other than GST
d) All of the above

B) State whether the following statements are True or False and Rewrite the full sentence **(Any Ten)** : **(10)**

1) A company and its sole agent are not related persons.
2) Manufacturer of Pan Masala is not eligible for composition levy.
3) Time of supply fixes the point when liability to charge GST arise.
4) IGST is one of the two taxes charged on every intra state transactions.
5) The aggregate turnover will be computed Permanent Account (PAN) number wise.
6) Salary received by director of XYZ Limited is liable for GST in the hands of the director.
7) Late fees and interest shall not be included in the value of supply.
8) The central tax shall not be utilized towards the payment of State Tax.
9) Any Supplies made to SEZ Unit or SEZ Developer are Inter State Supplies.
10) In the case of a sponsorship services provided by Mr. A to M/S. B limited, liability to pay GST is of M/S. B Limited.
11) A person cannot get registered under GST on voluntary basis.
12) Supplier is not necessarily a registered person.

2. A) Mr. Ashok is a Chartered Accountant provides you with the following information: **(10)**

	Particulars	₹
1.	Received fees for accounting work from clients	2,50,000
2.	Received fees for audit work from M/S Ram & Co.	1,20,000
3.	Received rent from Mr. Raju for renting commercial shop	60,000
4.	Salary earned for working as lecturer in RAS Degree College	3,00,000
5.	Coaching for Chartered Accountancy Course	1,40,000
6.	Purchase of stationery for office work	35,000
7.	Received gift at the time of his marriage	24,000

Compute the value of taxable supply and GST Liability of Mr. Ashok. GST rate to be taken CGST 9 % and SGST 9%.
All amounts given are excluding GST.

B) Classify the following activities as taxable supply and non-taxable supply : **(05)**

	Particulars	₹
1.	Commission received on sale of wheat	1,20,000
2.	Professional advice to his friend free of charge	10,000
3.	Sold goods to Mr. Kumar of Thane	67,000
4.	Hotel Room Rent of ₹800/- per day	10,000
5.	College fees for recognized course from recognized university	45,000

OR

2. C) M/s. Kavita & Sons (Property dealer) provides you details of following activities during the month August, 2018. Compute the value of taxable supply and GST Liability : **(10)**

	Particulars	₹
1.	Collected rent from shops	6,00,000
2.	Received rent from vacant land used for agricultural	2,00,000
3.	Received rent from premises let to a temple trust	1,50,000
4.	Rent received from land used for Mona Circus	7,50,000
5.	Paid stationery and Telephone bills	4,75,000
6.	Rent received on storing of Agricultural Produce	2,10,000
7.	Rent received from residential house	1,60,000

GST rate to be taken CGST 9 % and SGST 9%.
All amounts given are excluding GST.

D) Classify the following activities as taxable supply and non-taxable supply : **(05)**

	Particulars	₹
1.	Bank Charges on Current A/c	12,000
2.	Sold Wrist-watches and pocket watches	1,20,000
3.	Shampoos are distributed as free samples	50,000
4.	Services rendered by a Member of Parliament	35,000
5.	Renting premises for religious purpose	9,000

3. A) Mr. Alok, a registered dealer in Maharashtra, provides the following details for the month of March, 2019. Calculate his Net Liability under the GST Act : **(07)**
Opening balance in Electronic Credit Ledger :
IGST - ₹75,000/-, CGST - ₹10,000/-, SGST - ₹10,000/-

S. No.	Particulars	Amount
1.	Sold goods to Pradeep in Mysore (Karnataka)	1,50,000
2.	Sold goods to M/s Anil and Co in Pune (Maharashtra)	2,00,000
3.	Purchased goods from Vinod and Co from Sangli (Maharashtra)	60,000

FE409F2E3556320D906A8070223534F3

4.	Services availed from a consultancy firm in Surat (Gujarat)	100,000
5.	Purchased Goods from Jayant and Co from Mumbai (Maharashtra). No Tax invoice has been received.	50,000

Note : 1. All amounts are exclusive of GST.
2. Rates of IGST - 12%, SGST - 9%, CGST - 9%.

B) Determine the place of supply in each of the following giving reasons **(Any Four)**: **(08)**

1) Deepak having registered office in Meerut, imported goods into India from Singapore, which were received at Mumbai Airport.
2) M/s Siddhi Vinayak CHS Ltd., Mumbai, placed an order for Installation of Elevator with M/s Otis Elevators. The Elevator was installed at the society's building in Mumbai.
3) Deepali, a mehendi artist, based in Mumbai, travels to Udaipur, Rajasthan for an assignment for Bridal Mehendi.
4) M/s. Deepshikha Enterprises, based in Delhi, supplied a Videocom DTH connection from Videocom Ltd. based in Chennai to Mr. Sagar in Noida, Uttar Pradesh.
5) M/s. Arijit of Nanded, Maharashtra, sells 20 washing machines to M/s. Abhijeet of Kota, Rajasthan for delivery at his registered address in Kota.

OR

3. C) M/s. Winwin Ltd., a registered dealer in the state of Maharashtra, provides the following details for the month of February, 2019. Calculate the Net Liability under the GST Act : **(07)**

Opening balance in Electronic Credit Ledger :
IGST - ₹2,000/-, SGST - ₹5,000/-

S. No.	Particulars	Amount
1.	Sold goods to Mr. Ashok in Patiala (Punjab).	2,00,000
2.	Sold goods to M/s Vinay and Co in Virpur (Gujarat)	4,00,000
3.	Purchased goods from Ms. Mona from Dibrugarh (Assam)	1,00,000
4.	Services availed from a consultancy firm in Katra (Jammu and Kashmir)	1,00,000
5.	Purchased Goods from Mr. Kishanlal, from Amritsar (Punjab). The Tax invoice was received. However, the goods were not received	50,000

Note : 1. All amounts are exclusive of GST.
2. Rates of IGST - 12%, SGST - 9%, CGST - 9%.

D) Determine the place of Supply in each of the following giving reasons **(Any Four)**: **(08)**

1) Ustaad Zakir Hussein, Tabla Maestro, based in Mumbai, travels to Delhi for a performance at Delhi's Pragati Maidan.
2) M/s. BSNL Ltd. based in Delhi, supplied a landline to M/s. Speak up, in their office at Mathura, Uttar Pradesh.
3) M/s. A. K. Enterprises of Pune, Maharashtra sells 60 Television sets to M/s. K. A. Enterprises, Sangli & Maharashtra for delivery at Sangli, Maharashtra.

FE409F2E3556320D906A8070223534F3

4) Mr. Headcomb, a hairstylist, registered in Chennai, travels to Dubai to provide his services to Ms. Longhair, a resident of Dubai.

5) Mr. Pappu Sharma, a Punjab based registered comedian, hosted a comedy show at Muscat on the birthday of Mr. Tejkiran, a Mumbai based Registered person

4. A) M/s. Shivai Udyog has provided the following particulars relating to the goods sold by it to Ganesh Enterprises. **(10)**

Particulars	₹
List price of the Goods (Exclusive of Expenses, Taxes and Discounts)	60,000
Tax levied by local Municipal Corporation on above goods	10,000
Primary Packing	2,500
Extra Protective Packing	1,000
CGST & SGST chargeable on the Goods	7,200
Special Printing of its Name & Trade Mark on the Goods	2,500
Weighment Charges	2,000

M/s. Ganesh Enterprises received ₹5,000/- as subsidy from "Life is Good" a Non-Profit making Organization in respect of timely supply of goods.

The price of ₹60,000/- is after considering such subsidy. M/s. Shivai Udyog offers 5% trade discount on the list price of the goods.

Determine the value of Taxable supply made by M/s. Shivai Udyog. Also, calculate SGST @ 2.5% and CGST @ 2.5%.

B) Determine the time of Supply in each of the following cases as per the provisions of GST Act : **(05)**

S. No.	**Date of Supply of Service**	**Date of Invoice**	**Date of Payment**
1.	16.07.2018	19.07.2018	24.07.2018
2.	06.10.2018	17.11.2018	18.11.2018
3.	04.12.2018	03.12.2018	06.01.2019
4.	10.01.2019	10.02.2019	15.02.2019
5.	16.02.2019	28.02.2019	18.02.2019

OR

4. C) M/s. Gurunath a registered supplier, provides you the following details with respect to the contract entered with M/s. Shisha Enterprises for Supply of Goods : **(10)**

Value of Goods inclusive of IGST @18%		1,88,800
Taxes Other than GST		18,500
Following Expenses were incurred by M/s. Gurunath :		
a) Insurance Charges	8,000	
b) Freight Charges	5,000	
c) Designing Charges	6,000	19,000

Following Expenses were incurred by M/s. Shisha Enterprises on behalf of M/s. Gurunath :

Testing Charges	3,000

Expenses of ₹3,000/- was incurred on transportation by M/s. Shisha Enterprises not on behalf of M/s. Gurunath.

Subsidy of ₹20,000/- was received from the Udaan a NGO, list price is after considering such subsidy.

Calculate the value of supply. Also, calculate Tax Payable.

D) Determine the time of Supply in each of the following cases as per the provisions of GST Act : **(05)**

S. No.	Date of Removal	Date of Invoice	Date of Payment
1.	15.04.2018	18.04.2018	26.04.2018
2.	15.05.2018	14.05.2018	16.05.2018
3.	01.10.2018	16.10.2018	19.10.2018
4.	04.12.2018	06.12.2018	10.12.2018
5.	05.02.2019	10.02.2019	08.02.2019

5. A) **Gayatri Limited** a trading concern in Maharashtra is a registered dealer and wants to opt for composition scheme. It furnishes you with the following information for the year 2018-19 : **(07)**

Kindly advise :

a) Are they eligible to opt for the Composition Scheme?

b) If yes, calculate their composition tax liability (SGST @ 0.5% and CGST @ 0.5%).

The breakup of supplies are as follows :

Particulars	₹
Intra state Supply of Exempted goods to Mr. J.	13,00,000
Intra state supply of Taxable goods to Mr. K (Tax Rate @12%)	9,50,000
Intra state supply of Taxable goods to Mr. A (Tax Rate @ 5%)	3,45,000
Value of Inward Supply on which tax is payable on Reverse Charge Mechanism	7,00,000
Intra State Supply of taxable goods to Mr. Q (Tax Rate @18%)	10,00,000

All amount are exclusive of GST.

B) M/s. Sathe Bros. provide the details of transactions of their business from the State of Maharashtra during the month of October, 2018. Are they liable to get registered under GST? If yes, from when? **(08)**

Date	Particulars	Amount
08.10.2018	Goods supplied to Nanded (Maharashtra)	3,17,500
10.10.2018	Exempt supplies to Surat (Gujarat)	2,10,000
17.10.2018	Taxable goods supplied to Raver (Maharashtra)	11,50,000
19.10.2018	Inward supplies on which tax is payable under reverse charge	50,000
20.10.2018	Goods supplied to Nandurbar (Maharashtra)	3,50,000
25.10.2018	Services provided to Sangli (Maharashtra)	1,75,000

OR

5. C) **Speed Limited** a trading concern in Maharashtra is a registered dealer and wants to opt for composition scheme. It furnishes you with the following information for the year 2018-19 : **(10)**

Kindly advise :

a) Are they eligible to opt for the Composition Scheme?

b) If yes, then calculate their composition tax liability (SGST @ 0.5% and CGST @ 0.5%).

The breakup of supplies are as follows :

Particulars	₹
Intra State Supply of Exempted goods to Mr. Sangma.	10,00,000
Intra State Supply of Taxable goods to Mr. Sibal (Tax Rate @12%)	30,00,000
Intra State Supply of Taxable goods to Mr. Jaitley (Tax Rate @ 18%)	20,00,000
Intra State Supply of Taxable goods to Mr. Gadkari (Tax Rate @ 5%)	20,00,000
Value of Inward Supply on which tax is payable on Reverse Charge Mechanism	5,00,000

All amount are exclusive of GST.

D) State with reason whether the Dealer is required to get registered under GST or not. **(Any Four)** : **(08)**

1) A trader in the Hilly regions of Uttarakhand makes taxable supply of Goods to a trader in Uttarakhand for a value of ₹19,95,000/-

2) M/s. Siddhi Enterprises operating in Meerut, supplies taxable services of ₹15,00,000/- within Meerut.

3) Mr. Roger Bond, a Non- resident person, supplies taxable goods worth ₹5,00,000/- in Pune.

4) Ravindra, a farmer, sells agricultural goods worth ₹21 Lakhs cultivated by him on his own land.

5) Ms. Bhavisha situated in the State of Sikkim, supplies taxable goods worth ₹12 Lakhs.

6. A) State the benefits of Goods and Services Tax. **(10)**

B) Explain in brief, the conditions for availing Input Tax Credit and the time limit to avail it? **(10)**

OR

6. C) Write Short Notes on **(Any Four)** : **(15)**

i) Electronic Commerce Operator

ii) Composite and Mixed Supply

iii) Supplier

iv) Aggregate Turnover

v) Casual Taxable Person

vi) Electronic Credit Ledger

(मराठी भाषांतर)

(३ तास) **(एकूण गुण : १००)**

सूचना : १) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
२) **प्रश्नाच्या उजवीकडे** दाखविलेले गुण प्रश्नांचे **पूर्ण गुण** दर्शवितात.
३) उत्तराच्या नोंदी ह्या **उत्तराचा भाग** म्हणून देणे गरजेचे आहे.
४) जिथे गरज असेल त्याठिकाणी उत्तरे **दोन दशांश अपूर्णांकापर्यंत** देणे **आवश्यक** आहे.
५) **खालील प्रश्नांची उत्तरे** सोडविताना **०१.०४.२०१८** रोजी **वस्तू व सेवाकर** (जीएसटी) कायद्याच्या तरतूदी विचारात घेतल्या जाव्यात, त्यानंतरच्या **कायद्यातील दुरुस्तीचा विचार करु नये**.
६) **मूळ इंग्रजी प्रश्नपत्रिका प्रमाण** मानावी.

१. अ) अचूक पर्याय निवडून प्रश्न उत्तरासह पुन्हा लिहा **(कोणतेही दहा)** : **(१०)**

१) व्यक्तीच्या सेवनाकरीता असणाऱ्या मद्यावर : _____.
- अ) केंद्रीय वस्तू व सेवाकर लागतो
- ब) राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकर लागतो
- क) इंटिग्रेटेड वस्तू व सेवाकर लागतो
- ड) वस्तू व सेवाकर लागत नाही

२) वस्तू व सेवांवरील वस्तू व सेवाकर हा प्रत्येक वेळी _____ लागतो.
- अ) मागणीवर
- ब) रोख विक्रीवर
- क) पुरवठ्यावर
- ड) उत्पादनावर

३) वस्तू व सेवाकराअंतर्गत वस्तूच्या व्याख्येत _____ समाविष्ट नसते.
- अ) गवत
- ब) वाढते पिक
- क) फिर्याद करता येण्याजोगा दावा
- ड) पैसा व रोखे

४) मुंबईच्या मे. दिपक एंटरप्रायझेसने राजस्थानच्या मे. ज्योती असोशिएसला वस्तूंचा पुरवठा केल्यास त्यास _____ असे म्हटले जाते.
- अ) निर्यात पुरवठा
- ब) आयात पुरवठा
- क) राज्याच्या अंतर्गत पुरवठा
- ड) आंतरराज्यीय पुरवठा

५) ब्युटी ट्रिटमेंटच्या सेवेअंतर्गत सेवा देण्याची जागा ही _____ जागा असते.
- अ) सेवा घेणाऱ्याची
- ब) जिथे खऱ्या अर्थाने सेवा देण्यात आली ती
- क) पुरवठादाराची
- ड) नोंदणीकृत व्यक्तीची

६) खरेदीवरील (इनपुट) कराची जमा वजावट मिळण्याचा जास्तीत जास्त कालावधी हा _____.
- अ) वार्षिक रिटर्न भरण्याच्या तारखेपर्यंत असते
- ब) सप्टेंबर महिन्याचे रिटर्न भरण्याच्या मुदत तारखेपर्यंत असते
- क) वरीलपैकी सर्वात आधी येणाऱ्या (अ) किंवा (ब) पैकी असते
- ड) वरीलपैकी सर्वात नंतर येणाऱ्या (अ) किंवा (ब) पैकी असते

७) वस्तू व सेवाकराअंतर्गत नोंदणी करण्याकरिता _____ हा फॉर्म वापरतात.

अ) फॉर्म जीएसटीआर-१ ब) फॉर्म जीएसटीआर-आय

क) फॉर्म जीएसटी-आरईजी-०१ ड) फॉर्म जीएसटी आरईजी

८) महाराष्ट्र राज्यात वस्तू व सेवाकरांतर्गत नोंदणी करण्याकरिता किमान विक्रीची (उलाढालीची) मर्यादा (करप्राप्त) ही _____ इतकी आहे.

अ) ₹१० लाख ब) ₹२० लाख

क) ₹२५ लाख ड) ₹७५ लाख

९) कपात केलेला कर हा शासनाकडे _____ दिवसांत कपात केलेल्या महिन्याच्या समाप्तीनंतर भरणे आवश्यक असते.

अ) ७ ब) १०

क) १५ ड) २०

१०) श्यामने ₹८४,००० इतक्या किंमतीस माल खरेदी केला, ज्यात १२% इंटिग्रेटेड वस्तू व सेवाकर समाविष्ट आहे. तर ह्यावर श्यामला खरेदीवरील (इनपुट) कर वजावटीकरीता _____ इतकी जमा मिळेल.

अ) ₹९,००० ब) ₹४,५००

क) ₹१०,०८० ड) वरीलपैकी एकही नाही

११) श्री. उज्वल ह्याच्याकडून विक्रीवरील करदेय इंटिग्रेटेड वस्तू व सेवाकर ₹४०,००० इतका आहे. त्याच्याकडे खरेदीवर (इनपुट) कर जमा केंद्रीय वस्तू व सेवाकराच्या रुपाने ₹१०,०००/- व राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकराच्या ₹१०,०००/- आहे, तर त्याने भरणा करावयाची रक्कम _____ इतकी असेल.

अ) ₹२०,००० ब) ₹४०,०००

क) ₹६०,००० ड) वरीलपैकी एकही नाही

१२) वस्तू व सेवा पुरवठा करताना काढण्यात येणाऱ्या व्यवहार मुल्यात _____ समाविष्ट असतात.

अ) अनुदान

ब) प्रासंगिक खर्च

क) वस्तू व सेवाकरा व्यतिरिक्त येणारे कर व शुल्क

ड) वरीलपैकी सर्व

ब) खालील वाक्ये चूक वा बरोबर ते ओळखून पुन्हा लिहा **(कोणतेही दहा)** : **(१०)**

१) कंपनी व तिचा एकमेव एजंट ह्यांचा वस्तू व सेवा कराअंतर्गत परस्परांशी संबंध नसतो.

२) पान मसाला उत्पादन करणाऱ्यास कॉम्पोझिशन आकारणीचा पर्याय उपलब्ध नसतो.

३) पुरवठ्याची वेळ ही वस्तू व सेवाकर कधी देय आहे, हे ठरविते.

४) इंटिग्रेटेड वस्तू व सेवाकर हा राज्यपातळीवर लावण्यात येणाऱ्या दोन करांपैंकी एक असतो.

५) वस्तू व सेवाकराच्या अंतर्गत एकूण विक्री (उलाढाल) ही कायमच्या खाते क्रमांकाकडून (PAN) ठरते.

FE409F2E3556320D906A8070223534F3

६) एक्सवायझेड लिमिटेडकडून तिच्या संचालकास मिळणारे वेतन हे संचालकाच्या हातात वस्तू व सेवा कर प्राप्त असते.

७) वस्तू सेवाकराअंतर्गत पुरवठ्याचे मूल्य ठरविताना त्यात विलंब शुल्क व व्याज समाविष्ट केले जात नाही.

८) केंद्रीय वस्तू व सेवाकर हे राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकरातून भरणाकरतेवेळी वजा केले जात नाही.

९) एस.ई.झेड. युनिटला वा डेव्हलपरला केलेला कोणताही पुरवठा हा आंतरराज्यीय पुरवठा म्हणून गणला जातो.

१०) श्री. अे. ने मेसर्स बी. लिमिटेडला प्रायोजित सेवा पुरविल्यास वस्तू व सेवाकर भरण्याची जबाबदारी मे. बी. लिमिटेडची असते.

११) एखादी व्यक्ती वस्तू व सेवाकराअंतर्गत स्वेच्छेने नोंदणी करु शकत नाही.

१२) पुरवठादार हा नोंदणीकृत व्यक्ती असणे गरजेचे नसते.

२. **अ)** व्यवसायाने सनदी लेखापाल असणाऱ्या श्री. अशोकने आपणांस खालील माहिती दिलेली आहेः **(१०)**

	तपशील	**₹**
१.	लेखांकनाच्या कामाची अशिलांकडून फी मिळाली	२,५०,०००
२.	लेखापरीक्षणाच्या कामाची मे. राम आणि कंपनीकडून फी मिळाली	१,२०,०००
३.	श्री. राजूस व्यापारी गाळा भाड्याने दिला त्याचे भाडे मिळाले	६०,०००
४.	आर.ए.एस. डिग्री कॉलेजमधून 'व्याख्याता' म्हणून काम करण्याचे वेतन मिळाले	३,००,०००
५.	चार्टर्ड अकाऊंटसी कोर्सच्या शिकवणीचे पैसे मिळाले	१,४०,०००
६.	कार्यालयीन कामकाजाकरीता स्टेशनरी खरेदी केली	३५,०००
७.	लग्नप्रसंगी भेटवस्तू मिळाल्या	२४,०००

वरील माहितीच्या आधारे श्री. अशोकचे करप्राप्त वस्तू व सेवाकरासाठीचे मुल्य व त्यावरील देय असलेले वस्तू व सेवाकराची रक्कम काढा. त्याकरीता वरील सर्व सेवांकरीता वस्तू व सेवाकराचा दर केंद्रीय वस्तू व सेवाकराचा दर – ९%, राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकराचा दर – ९% घेण्यात यावा. वरील सर्व रकमा ह्या वस्तू व सेवाकर समाविष्ट नसलेल्या आहेत.

ब) खाली दिलेल्या वस्तू व सेवा पुरविण्याच्या व्यवहारामधून करप्राप्त व करमुक्त वस्तू व सेवांचे वर्गीकरण करा : **(०५)**

	तपशील	**₹**
१.	गव्हाच्या विक्रीवर कमिशन मिळाले	१,२०,०००
२.	मित्रास फुकटात व्यावसायिक सल्ला दिला	१०,०००
३.	ठाणे येथील श्री. कुमार ह्यास माल विकला	६७,०००
४.	हॉटेलमधील रुमचे भाडे प्रतिदिन ₹८००/–	१०,०००
५.	मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या मान्यता प्राप्त अभ्यासक्रमाकरीता कॉलेजची फी भरली	४५,०००

FE409F2E3556320D906A8070223534F3

किंवा

२. **क)** प्रॉपर्टी व्यावसायिक असलेल्या मेसर्स कविता ॲंड सन्स ह्यांनी त्यांच्या ऑगस्ट २०१८ ह्या महिन्याची व्यवहारविषयक माहिती खालीलप्रमाणे दिलेली आहे. त्यावरुन त्यांचे वस्तू व सेवाकर आकारणी करीताचे करप्राप्त मूल्य व त्यावरील देय असलेले वस्तू व सेवाकर काढा : **(१०)**

	तपशील	₹
१.	दुकानांचे भाडे मिळाले	६,००,०००
२.	शेतीकरीता वापरलेल्या मोकळ्या जागेचे भाडे मिळाले	२,००,०००
३.	मंदिराच्या विश्वत संस्थेला दिलेल्या जागेचे भाडे मिळाले	१,५०,०००
४.	मोना सर्कसला दिलेल्या जागेचे भाडे मिळाले	७,५०,०००
५.	स्टेशनरी व टेलिफोन बिलाचे पैसे भरले	४,७५,०००
६.	शेतमाल साठवून ठेवण्याकरीता भाडे मिळाले	२,१०,०००
७.	निवासी घराचे भाडे मिळाले.	१,६०,०००

वरील सर्व व्यवहारांकरीता वस्तू व सेवाकराचा दर केंद्रीय वस्तू व सेवाकराचा दर – ९%, राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकराचा दर – ९% घेण्यात यावा.

वरील सर्व रक्कमांमध्ये वस्तू व सेवाकर समाविष्ट नाही.

ड) खाली दिलेल्या वस्तू व सेवा पुरविण्याच्या व्यवहारामधून करप्राप्त व करमुक्त वस्तू व सेवांचे वर्गीकरण करा : **(०५)**

	तपशील	₹
१.	चालू खात्यावरील बँक चार्जेस	१२,०००
२.	मनगटी व खिश्यातील घड्याळे विकली	१,२०,०००
३.	शांपूचे नमुने मोफत वाटले	५०,०००
४.	खासदाराने दिलेल्या सेवांचे मूल्य	३५,०००
५.	धार्मिक कार्याकरीता दिलेल्या जागेचे भाडे मिळाले	९,०००

३. **अ)** महाराष्ट्रात नोंदणीकृत असलेल्या श्री. अलोकने त्याच्या मार्च, २०१९ ह्या महिन्यातील व्यवहारांची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे. त्याआधारे त्यांच्याकडून वस्तू व सेवाकराच्या कायद्याअंतर्गत निव्वळ देय असलेली रक्कम काढा. **(०७)**

आरंभीची शिल्लक – इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीतील.

इंटिग्रेटेड वस्तू व सेवाकर – ₹७५,०००/–, केंद्रीय वस्तू व सेवाकर – ₹१०,०००/–, राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकर – ₹१०,०००/–

अ. क्र.	तपशील	रक्कम
१.	कर्नाटकातील म्हैसूरास्थित प्रदीपला माल विकला	१,५०,०००
२.	महाराष्ट्रातील पुणेस्थित मे. अनिल आणि कंपनीला माल विकला	२,००,०००
३.	महाराष्ट्रातील सांगलीस्थित विनोद आणि कंपनीकडून माल घेतला	६०,०००
४.	गुजराथ येथील कन्सल्टसी फर्मकडून सेवा घेतल्या	१००,०००
५.	महाराष्ट्रातील मुंबई येथील जयंत आणि कंपनीकडून माल घेतला परंतु अजूनही त्याचे करयुक्त बिल मिळालेले नाही	५०,०००

टिप : १. वरील सर्व रक्कमांमध्ये वस्तू व सेवाकर समाविष्ट नाही.

२. वरील सर्व व्यवहारांकरीता इंटिग्रेड वस्तू व सेवाकराचा दर –१२%, राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकराचा दर – ९%, केंद्रीय वस्तू व सेवाकराचा दर – ९% घेण्यात यावा.

ब) खालील प्रत्येक बाबींमध्ये कारणासहीत पुरवठ्याची जागा निश्चित करा : **(०८)**

१) मिरठ येथील नोंदणीकृत कार्यालय असलेल्या दिपकने सिंगापूरहून भारतात आयात केलेला माल मुंबईच्या विमानतळावर स्विकारण्यात आला.

२) मुंबई येथील मे. सिध्दी विनायक गृहनिर्माण संस्थेने त्यांच्या इमारतीत मेसर्स ओटीस एलेवेटर्स ह्यांच्याकडून उद्वाहन लावून घेतले.

३) मुंबई येथील दिपाली ह्या मेहंदी काढणाऱ्या कलाकाराने राज्यस्थानातील उदयपूरस्थित नववधूला मेहंदी काढली.

४) दिल्ली येथील मे. दिपाशिखा एंटरप्रायझेस व्हिडिओकॉम लिमिटेडच्या चेन्नईच्या कार्यालयातून, उत्तरप्रदेशच्या नॉयडास्थित श्री. सागरला व्हिडिओकॉमच्या डी.टी.एच. कनेक्शनचा पुरवठा केला.

५) महाराष्ट्राच्या नांदेड येथील मे. अरिजीतने राजस्थाच्या कोटा येथे राहणाऱ्या मे. अभिजीतला त्याच्या कोटा येथील नोंदणीकृत कार्यालयात २० वॉशिंग मशिन विकल्या.

किंवा

३. क) महाराष्ट्रात नोंदणीकृत असलेल्या मेसर्स विनविन लिमिटेडने त्यांच्या फेब्रुवारी, २०१९ ह्या महिन्यातील व्यवहारांची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे. त्याआधारे त्यांच्याकडून वस्तू व सेवाकराच्या कायद्याअंतर्गत निव्वळ देय असलेली रक्कम काढा. **(०७)**

आरंभीची शिल्लक – इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहितील

इंटिग्रेटेड वस्तू व सेवाकर – ₹२,०००/–,

राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकर – ₹५,०००/–.

अ.क्र.	तपशील	रक्कम
१.	पंजाबमधील पतियाळास्थित श्री. अशोकला माल विकला	२,००,०००
२.	गुजरातयेथील विरपुरला असणाऱ्या मे. विनय आणि कंपनीला माल विकला	४,००,०००
३.	आसाम येथील दिब्रुगडास्थित कुमारी मोनाकडून माल खरेदी केला	१,००,०००
४.	जम्मू आणि काश्मीर येथील कत्रास्थित कन्सल्टंसी फर्मकडून सेवा घेतल्या	१,००,०००
५.	पंजाबमधील अमृतसर येथील श्री. किशनलाल ह्यांच्याकडून माल खरेदी केला. ह्या ठिकाणी करयुक्त बिल आलेले आहे. परंतु माल आलेला नाही.	५०,०००

टिप : १. वरील सर्व रक्कमांमध्ये वस्तू व सेवाकर समाविष्ट नाही.

२. वरील सर्व व्यवहारांकरीता इंटिग्रेड वस्तू व सेवाकराचा दर – १२%, राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकराचा दर – ९%, केंद्रीय वस्तू व सेवाकराचा दर – ९% घेण्यात यावा.

FE409F2E3556320D906A8070223534F3

ड) खालील प्रत्येक बाबींमध्ये कारणासहीत पुरवठ्याची जागा निश्चित करा **(कोणतेही चार)** : **(०८)**

१) मुंबई येथील तबलावादक उस्ताद झाकिर हुसैन ह्यांनी दिल्लीच्या प्रगती मैदानात कार्यक्रम सादर केला.

२) दिल्ली येथील मे. बी.एस.एन.एल. लिमिटेडने उत्तरप्रदेशातील मथुरा येथे असणाऱ्या मे. स्पिक अपच्या ऑफिसला दूरध्वनीचा सेवासंच पुरविली.

३) महाराष्ट्रातील सांगली येथील मे. अे. के. ह्यांनी महाराष्ट्रातील सांगली येथील मे. के. अे. एंटरप्रायझेसला ६० दूरचित्रवाणी संच विकले.

४) चेन्नई येथील नोंदणीकृत केशरचनकार श्री. हैडकोंब ह्यांनी दुबईस्थित कुमारी लाँगहेअर हिला सेवा दिली.

५) पंजाबयेथील नोंदणीकृत विनोदी कलाकार श्री. पप्पुशर्मा ह्यांनी मुंबई येथील नोंदणीकृत श्री. तेजकिरण ह्याच्या वाढदिवसानिमित्त मस्कत येथे विनोदी कार्यक्रमाचे आयोजन केले.

४. अ) मे. शिवाई उदयोग ह्यांनी गणेश एंटरप्रायझेसला विकलेल्या मालासंबंधी खालील माहिती दिलेली आहे. **(१०)**

तपशील	**₹**
वस्तूंची विक्री किमंत (कर खर्च व सवलतरहीत)	६०,०००
स्थानिक महानगरपालिकेने वस्तूंवर आकारलेला कर	१०,०००
प्राथमिक वेष्टनचा खर्च	२,५००
अधिकचा संरक्षित वेष्टन खर्च	१,०००
वरील वस्तूंवरील केंद्रीय व राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकर	७,२००
वस्तूंवरील विशिष्ट नावाचा व ट्रेडमार्कच्या छपाईचा खर्च	२,५००
वजन करण्याचा खर्च	२,०००

मे. गणेश एंटरप्रायझेस ह्यांना 'ना नफा' तत्त्वावर काम करणाऱ्या ''लाईफ इज गुड'' ह्या संस्थेकडून वेळेत मालाचा पुरवठा केल्याबद्दल ₹५,०००/- अनुदान मिळाले.

वर दिलेले ₹६०,०००/- हे सदर अनुदानाचा विचार करुन देण्यात आलेले आहे. मे. शिवाई उदयोग वस्तूंच्या लिस्ट किमंतीवर ५% व्यापारविषयक सवलत देते.

वरील माहितीच्या आधारे मे. शिवाई उदयोगाचा करप्राप्त पुरवठ्याचे मुल्य काढा आणि त्यावरील वस्तू व सेवाकर दर केंद्रीय वस्तू व सेवाकराचा दर – २.५%, राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकराचा दर – २.५% घेण्यात यावा.

ब) खालील प्रत्येक बाबतीत वस्तू व सेवा कराच्या कायद्याअंतर्गत पुरवठ्याची वेळ निश्चित करा : **(०५)**

अ.क्र.	**सेवा पुरवल्याची तारीख**	**बिलाची तारीख**	**रक्कम दिल्याची तारीख**
१.	१६.०७.२०१८	१९.०७.२०१८	२४.०७.२०१८
२.	०६.१०.२०१८	१७.११.२०१८	१८.११.२०१८
३.	०४.१२.२०१८	०३.१२.२०१८	०६.०१.२०१९
४.	१०.०१.२०१९	१०.०२.२०१९	१५.०२.२०१९
५.	१६.०२.२०१९	२८.०२.२०१९	१८.०२.२०१९

किंवा

४. **क)** मे. गुरुनाथ नोंदणीकृत पुरवठादार ह्यांनी मे. शिशा एंटरप्रायझेसला माल विकण्याच्या केलेल्या करारांतर्गत आपणांस खालील तपशील दिला आहे : **(१०)**

वस्तूंचे मुल्य (इंटिग्रेटेड वस्तू व सेवाकर – १८% समाविष्ट असलेले)		१,८८,८००
वस्तू व सेवाकर सोडून इतर कर		१८,५००

मे. गुरुनाथने केलेल्या खर्चांचा तपशील खालीलप्रमाणे :

अ)	विम्याचा खर्च	८,०००	
ब)	माल वाहतुकीचा खर्च	५,०००	
क)	आरेखनाचा खर्च	६,०००	१९,०००

मे. शिशा एंटरप्रायझेसने मे. गुरुनाथच्या वतीने केलेले खर्च खालीलप्रमाणे :

चाचणीचा खर्च	३,०००

इतर खर्च (स्वतः करीताचा) माल वाहतुकीचा खर्च ₹३,०००/– उडान नावाच्या बिगर शासकीय संस्थेकडून ₹२०,०००/– अनुदान मिळाले. उपरोक्तलेखित लिस्ट किंमत सदन अनुदानाचा विचार करुन काढण्यात आलेली आहे.

तरी वरील माहितीच्या आधारे पुरवठ्याचे मुल्य व त्यावरील देयकर काढावा.

ड) खालील प्रत्येक बाबतीत वस्तू व सेवा कराच्या कायद्याअंतर्गत पुरवठ्याची वेळ निश्चित करा : **(०५)**

अ.क्र.	माल बाहेर काढल्याची तारीख	बिलाची तारीख	रक्कम दिल्याची तारीख
१.	१५.०४.२०१८	१८.०४.२०१८	२६.०४.२०१८
२.	१५.०५.२०१८	१४.०५.२०१८	१६.०५.२०१८
३.	०१.१०.२०१८	१६.१०.२०१८	१९.१०.२०१८
४.	०४.१२.२०१८	०६.१२.२०१८	१०.१२.२०१८
५.	०५.०२.२०१९	१०.०२.२०१९	०८.०२.२०१९

५. **अ)** महाराष्ट्रातील **गायत्री लिमिटेड** ही नोंदणीकृत व्यापारी संस्था असून त्यांना समाविष्ट (कॉम्पोझिशन) योजनेअंतर्गत जावे किंवा कसे हे ठरवायचे आहे. त्याकरिता त्यांनी आपणांस २०१८–१९ ह्या वर्षाची माहिती खालीलप्रमाणे दिलेली आहे: **(०७)**

खालील माहितीच्या आधारे कृपया सल्ला द्या :

१) त्यांना समाविष्ट (कॉम्पोझिशन) योजनेचा लाभ घेता येईल का?

२) उत्तर, होय असल्यास त्यांची समाविष्ट (कॉम्पोझिशन) योजनेअंतर्गत कर देयता काढा. (त्याकरिता राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकर ०.५% व केंद्रीय वस्तू व सेवाकर ०.५% इतका घेण्यात यावा).

तपशील	₹
राज्याच्याअंतर्गत श्री. जे. ला केलेल्या करामुक्त मालाचा पुरवठा	१३,००,०००
राज्याच्याअंतर्गत श्री. के. ला केलेल्या करप्राप्त मालाचा पुरवठा (कराचा दर १२%)	९,५०,०००
राज्याच्याअंतर्गत श्री. अे. ला केलेल्या करप्राप्त मालाचा पुरवठा (कराचा दर ५%)	३,४५,०००

खरेदी केलेल्या मालाचे मूल्य ज्यावर परतीच्या कर यंत्रणे अंतर्गत कर देय आहे	७,००,०००
राज्याच्याअंतर्गत श्री. क्यु. ला केलेल्या करप्राप्त मालाचा पुरवठा (कराचा दर१८%)	१०,००,०००

टिप : वरील सर्व रकमा ह्या वस्तू व सेवाकराशिवाय दिलेल्या आहेत.

ब) महाराष्ट्रातील मे. साठे बंधूंनी त्यांच्या व्यवसायाच्या ऑक्टोबर, २०१८ ह्या महिन्याच्या व्यवहारांचा तपशील खालीलप्रमाणे दिलेला आहे. तरी सदर माहितीचा विचार करता त्यांनी वस्तू व सेवाकराच्या कायद्याअंतर्गत नोंदणी करुन घेणे गरजेचे आहे का? असल्यास कधीपासून? **(०८)**

दिनांक	तपशील	रक्कम
०८.१०.२०१८	महाराष्ट्रातील नांदेडला मालाचा पुरवठा केला	३,१७,५००
१०.१०.२०१८	गुजराथमधील सुरतला करमुक्त मालाचा पुरवठा केला	२,१०,०००
१७.१०.२०१८	महाराष्ट्रातील रावेरला करप्राप्त मालाचा पुरवठा केला	११,५०,०००
१९.१०.२०१८	खरेदी ज्यावर परतीच्या कर यंत्रणेनुसार कर देय आहे	५०,०००
२०.१०.२०१८	महाराष्ट्रातील नंदुरबारला मालाचा पुरवठा केला	३,५०,०००
२५.१०.२०१८	महाराष्ट्रातील सांगली येथे सेवा पुरविल्या	१,७५,०००

किंवा

५. **क)** महाराष्ट्रातील **स्पिड लिमिटेड** ही नोंदणीकृत व्यापारी संस्था असून त्यांना समाविष्ट (कॉम्पोझिशन) योजनेअंतर्गत जावे किंवा कसे हे ठरवायचे आहे. त्याकरीता त्यांनी आपणांस २०१८-१९ ह्या वर्षांची माहिती खालीलप्रमाणे दिलेली आहे: **(१०)**

खालील माहितीच्या आधारे कृपया सल्ला द्या :

१) त्यांना समाविष्ट (कॉम्पोझिशन) योजनेचा लाभ घेता येईल का?

२) उत्तर, होय असल्यास त्यांची समाविष्ट (कॉम्पोझिशन) योजनेअंतर्गत कर देयता काढा. (त्याकरिता राज्यपातळीवरील वस्तू व सेवाकर ०.५% व केंद्रीय वस्तू व सेवाकर ०.५% इतका घेण्यात यावा).

तपशील	₹
राज्याच्याअंतर्गत श्री. संगमा ह्यांना केलेल्या करमुक्त मालाचा पुरवठा	१०,००,०००
राज्याच्याअंतर्गत श्री. सिबल ह्यांना केलेल्या करप्राप्त मालाचा पुरवठा (कराचा दर १२%)	३०,००,०००
राज्याच्याअंतर्गत श्री. जेटली ह्यांना केलेल्या करप्राप्त मालाचा पुरवठा (कराचा दर १८%)	२०,००,०००
राज्याच्याअंतर्गत श्री. गडकरी ह्यांना केलेल्या करप्राप्त मालाचा पुरवठा (कराचा दर ५%)	२०,००,०००
खरेदी केलेल्या मालाचे मुल्य ज्यावर परतीच्या कर यंत्रणेअंतर्गत कर देय आहे	५,००,०००

टिप : वरील सर्व रकमा ह्या वस्तू व सेवाकराशिवाय दिलेल्या आहेत.

FE409F2E3556320D906A8070223534F3

ड) खालील व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवाकराच्या कायद्याअंतर्गत नोंदणी करणे गरजेचे आहे का हे कारणासही विशद करा **(कोणतेही चार)** : **(०८)**

१) उत्तरखंडाच्या डोंगराळ भागातील व्यापाऱ्याने उत्तरखंडाच्या दुसऱ्या व्यापाऱ्यास करप्राप्त मालाचा पुरवठा केला ₹१९,९५,०००/-

२) मिरुठ येथील मे. सिध्दी एंटरप्रायझेशने मिरुठमध्येच करप्राप्त सेवा पुरविल्या ₹१५,००,०००/-.

३) श्री. रॉगर बाँड ह्या अनिवासी भारतीयाने करप्राप्त मालाचा पुरवठा पुणे येथे ₹५,००,०००/- केला.

४) रविंद्र नावाच्या शेतकऱ्याने त्याच्यात शेतात पिकविलेला शेतमाल ₹२१ लाखांना विकला.

५) सिक्किम येथे राहणाऱ्या मिस. भाविषा हिने करप्राप्त मालाचा ₹१२ लाख पुरवठा केला.

६. अ) वस्तू व सेवाकराचे फायदे विशद करा. **(१०)**

ब) खरेदीवरील (इनपुट) कराची वजावट मिळविण्याकरिता कराव्या लागणाऱ्या अटींची पुर्तता थोडक्यात लिहा व त्यासाठी असणाऱ्या कालमर्यादेची स्पष्टता करा. **(१०)**

किंवा

क) टिपा लिहा **(कोणतेही चार)** : **(१५)**

१) इलेक्ट्रॉनिक व्यापार चालक.

२) समाविष्ट व मिश्र पुरवठा.

३) पुरवठादार.

४) एकूण उलाढाल (विक्री).

५) नैमित्तिक करदेय व्यक्ती.

६) इलेक्ट्रॉनिक जमा खातेवही.

FE409F2E3556320D906A8070223534F3